सद्गुरु कृपा नव्हतां । नव्हती देवाची कथा वार्ता ।
देवासी देवपणीं स्थापिता । सत्य सर्वथा सद्गुरु ॥ ४४६ ॥

सद्गुरु कृपेवीण पाहीं । देवो असतूचि जाला होता नाहीं ।
त्यासी देवपण ठेवूनि ठायीं । भजविता पाहीं गुरुरावो ॥ ४४७ ॥

त्या सद्गुरूची कथा । चुकोनि जालों बोलता ।
थोर अपराधु हा माझे माथां । क्षमा श्रोतां करावी ॥ ४४८ ॥

वृथा बोलिलों नाहीं जाण । जालें बोलावया कारण ।
दत्तात्रेय शिष्य कथन । करितां जनार्दन आठवला ॥ ४४९ ॥

मी जरी नाठवीं जनार्दनासी । परी तो विसरों नेदीच आपणासी ।
हटें देतुसें आठवणेंसी । अहर्निशीं सर्वदा ॥ ४५० ॥

जिकडे जिकडे मी पाहें । तिकडे तिकडे तोचि होऊनि राहे ।
मी जरी त्याकडे न पाहें । तें न पाहाणेंही होय तो माझें ॥ ४५१॥

जिकडे मी विसरों जाये । तिकडेचि तो येऊनि राहे ।
मी जरी त्याकडे न पाहें । तें न पाहाणें होय तो माझें ॥ ४५२॥

घटु सांडू पाहे आकाशासी । तंव आकाश न सांडी घटासी ।
तेवीं जनार्दनु आम्हासीं । अहर्निशीं लागला ॥ ४५३ ॥

मी न करीं त्याची कथा । तंव तोचि होये मुखीं वक्ता ।
ऐसेंनि बलात्कारें बोलवितां । काय म्यां आतां करावें ॥ ४५४ ॥

दृश्य मी देखावया बैसें । तंव दृश्यासबाह्य जनार्दनु दिसे ।
श्रवणीं ऐकतां सौरसें । शब्दीं प्रवेशे जनार्दनू ॥ ४५५ ॥

आतां नाइकें न पाहें । म्हणौनि मी उगा राहें ।
तंव उगेपणाचेनि अन्वयें । जनार्दनु पाहों लागला ॥ ४५६ ॥

ऐसा अडकलों त्रिशुद्धी । जनार्दनू उपडों नेदी ।
श्रोतां सांगावी जी बुद्धी । मी अपराधी सर्वथा ॥ ४५७ ॥

श्रोते म्हणती नवलावो । येथ न देखों अहंभावो ।
पाहतां बोलाचा अभिप्रावो । प्रेम पहा हो लोटत ॥ ४५८ ॥

येथील विचारितां बोल । क्षीराब्धीहूनि सखोल ।
नवल प्रेमाची वोल । येताती होऊ स्वानंदें ॥ ४५९ ॥

जें त्वां केलें गुरु निरूपण । तें सप्रेम ब्रह्मज्ञान ।
थोर निववितों जाण । नाहीं दूषण निरूपणा ॥ ४६० ॥

नित्य करावें गुरुस्मरण । तें गुरुप्रेम केलें कथन ।
करितां अमृताचें आरोगण । पुरे कोण म्हणेल ॥ ४६१ ॥

जनार्दनीं दृढ भावो । हाही कळला अभिप्रावो ।
निरूपणाचा नवलावो । रसाळ पाहो वोडवला ॥ ४६२ ॥

तूं मूळकथा निरूपिसी । अथवा आडकथा सांगसी ।
परी गोडीया निरूपणा ऐसी । न देखों आणिकांसी सर्वथा ।४६३

शुद्ध निरूपणें गुरु वर्णिसी । वर्णूनि अपराधी म्हणविसी ।
ऐक्यें घोळली बुद्धी कैसी । मानु श्रोत्यांसी वाढविला ॥४६४ ॥

तुझी जे अपराध बुद्धी । ते प्रवेशली भगवत्पदीं ।
जाली अपराधाची शुद्धी । देखणा त्रिशुद्धी तूं होसी ॥ ४६५ ॥

गुरुस्तवनीं रतसी । तेव्हां मूळकथा विसरसी ।
प्रेमाची जाती ऐसी । कळलें आम्हांसी सर्वथा ॥ ४६६ ॥

श्रोते म्हणती आतां । विस्मयो दाटला चित्ता ।
वेगीं चाळवावें ग्रंथा । पूर्वकथा मुळींची ॥ ४६७ ॥

हें संतवचन मानूनि माथां । चरण वंदूनि तत्वतां ।
सावधान व्हावें चित्ता । पुढील कथा सांगेन ॥ ४६८ ॥

यापरी तो अवधूतु । यदूसी सांगे परमार्थु ।
संवादें निमाला परमाद्भुतु । मग निवांतु राहिला ॥ ४६९ ॥

## स्फुट विषय

महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार ह भ. परायण रा. रा. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज यांचीं प्रासादिक निवडक पदें:—

### पद

आज पासुनी मना गव्हारा ! ऐसें वागत रहा ।
खिळ घालून तोंडास चक्षुनें मौज जगाची पहा ॥ धृ० ॥

बोले त्यासीं बोलत जावें सरळपणानें सदा ।
निजवचनाला यत्किंचित्‌ही विसरूं नको तूं कदा ॥

चा.—नको वाहुं कुणाचा मोह मना । मानसीं ।
का उगीच जाऊनी मृगजळ कवटाळिसी ।

गंधर्व—नगरिचे वऱ्हाड कां जमविसी ।
कुणी कुणाचें खचीत नाहीं ध्यानिं धरुन हें रहा ।
' माझें माझें ' तुज म्हणवीते माया दुर्धर महा ॥ १ ॥

भल्या बुऱ्यानें जग हें भरलें शोधुन पाहीं मना ।
नाहिं ठिकाणा म्हणून उरला दोष लावण्या कुणा ।
दुर्गुण टाकून निजहित व्हाया गृहण करीं सद्‌गुणा ।
कटुवचनें बोलुनियां दुखवूं नको कुणाच्या मना ।

चा.—जशि रविप्रकाशा आवड कशाची नसे ।
पाहिल्या कि तो तर चहुंकडे भरला असे ।
॥ तूं देव बऱ्याबुरिं वर्तन अपुलें तसें ।

अपुल्या पुरतें आपण पहावें उतरंडिस वायां ।
जाऊं नको तूं कदा पराच्या बापा ! उतराया ॥ २ ॥

घाण सांचली घरांत तुझिया तीच काढ वा आधीं।
अहंपणानें तोंड घालण्या जाईन कोणा मधीं।
निंदास्तुतिवर लाव गव्हारां! विवेक कांटी आधीं।
कोप खड्‌ग घेऊनी करीं तूं शांति कदा नावधीं।

चा.—आयुष्य तुझें हें जळ लहरीच्या परी।
यासाठीं तयाचा विचार कर अंतरीं।
दवडीं न पळाला भज अक्षय श्रीहरी।

दासगणु म्हणे पांडुरंग–पदिं रुंजी घालित रहा।
भक्ति मधूला सेवित जावें, तें तुज तारिल पहा ॥ ३ ॥

## पद

॥ विवेक निशीदिनीं वरा दादानों, विवेक निशीदिनीं वरा ॥
तरि विठ्ठल येइल घरा दादानों वि० ॥ धृ० ॥

चा.—नाहिं लोभ कुणाचा बरा
स्थळ द्या न मनीं मत्सरा
॥ क्रोधाचि होळी ती करा
मद, अहंपणा दुर धरा दा० ॥ १ ॥

भवनदी भरलि दोथडी
नका टाकूं इच्छा मधिं उडी
हरि-नाम हीच सांगडी-
करुनियां नदिस या तरा दा० ॥ २ ॥

धन, मान, जमिन, कामिना।
हे क्षणिक सर्वही गणा॥
आले अंतिं न कामा कुणा।
भलभलत्या न गमजा करा दा० ॥ ३ ॥

नको योग, याग, तर्पण ।
नको व्रतादि उद्यापन ॥
वहा विठ्ठल-चरणीं मन ।
गणु म्हणे दयेचा वरा दा० ॥ ४ ॥

पद ( श्रीमंत पतीची )

भुलुं नको मना । संसारा ना येथ सुखाचा वारा ॥ धृ० ॥

दुःखाचें मूळ संसार ।
वा ! करिल बहुत बेजार ॥
लोभाचे करुम मांजर ।
तुज फिरविल दारोदारा ना० ॥ १ ॥

मानिसी जयाते गोत ।
ते वैरि तुझे साक्षात ॥
ढकलुनी मोह-भंवऱ्यांत ।
तुज फिरवितील गरगरा ना० ॥ २ ॥

कामिनी नव्हे कटियार ।
प्रेमाचा करिल तुज वार ॥
वा खरुज कोरडी थोर
खाजवूं नको खरखरा ना० ॥ ३ ॥

नको होऊं मना ! तूं धुंद
धरिं विठ्ठल-नामी छंद
हा तरिच तुटे भव-बंद
कथि गणू करुनि विचार ना० ॥ ४ ॥

पद ( चाल. रामस्मरावाराम )

होउनियां निष्काम ध्यावा जानकि जीवन राम ध्रु०

कोण कुणाचे बाइल भाचे
सर्व धनाचें काम ध्या० १

सार न किमपी या संसारी
अनीतिचें हें धाम ध्या० २

दासगणु म्हणे राम जपावा
देइल तोचि विराम ध्या० ३

पद ( चाल. फटका )

ब्रम्हचर्य तोंवरी, जोंवरी स्त्री नच पडली गळां ।
उदार कुणबी, जोंवरी त्याचा पिकला नाहीं मळा ॥

भाग्यवान् नर तोंच जोंवरी नच आली अवकळा।
शूरत्वाच्या गोष्टी, जोंवर वत्ति न बंदुकिळा ॥ १ ॥

निरिच्छ वृत्ती, ढिग सोन्याचा जोंवर नच देखिला ।
वैराग्याच्या गोष्टी, जोंवरि मिळविति मृत्त मातिका ॥ २ ॥

तृप्त पोट ते, जोंवरि नाहीं जठराग्नी भडकला ।
दासगणु म्हणे खरें न जें जे त्यांत न कांहीं कळा ॥ ३ ॥

पद ( चाल—सदर )

कठिण वाट अति विकट गड्यांनो विषय-वनींची पहा ।
शृंगाररूपी तें गवत उगवलें सावध होऊन रहा ॥ धृ० ॥

सौंदर्य स्त्रियांचें हेच तरूवर परम-रम्य बा ! इथें ।
अनीति कोकिळ स्तन ते दोन्ही होतिळ तुज वाहसे ॥

क्षणिक सौख्यही शीतल छाया वाटेल तुज बा खरी ।
नरा सावजा ! भुलुं नको त्याला ती मृत्यूची दरी ॥
पंचबाण तो अनंग राजा भिल्ल तिथें नांदतो ।
तरूण स्त्रीच्या नेत्र कटाक्षें शर अपुले सोडितो ॥
विषय-वासना हेच तयांचे दुर्धर फांसे महा ।
दास गणु म्हणे त्यांत गुतल्या सुटणें मुष्किल पहा ॥ १ ॥

पद

माया ममता लोभ अहेत परमार्थाचे अरि ।
तर्दंकित मना झाल्या नुमगे बापा ! तुजला हरि ॥ धृ० ॥
दांभिक भक्ति अचरुनि जगतीं संतपणा तो जरी ।
मेळविला तरि उमगेल हें बेगड कथिला वरी ॥ १ ॥
कापुनि माना ब्राह्मण-भोजन नित्य जरी घातलें ।
परि तें अवघें व्यर्थ जणू कारेतिंत जल ओतिलें ॥ २ ॥
भूतदया मनिं, वचन सत्यतें सद्भक्ती अंतरीं ।
असल्या गणु म्हणे येइल चालत विठ्ठल माझा घरीं ॥ ३ ॥

पद ( चाल—माझि विनवणी.)

आल्या संसारि संसारी होय जागा
गव्हारा ध्याइं पांडुरंगा ॥ धृ० ॥
नको विषयाचा विषयाचा खेळुं पिंगा
अनीतिस देऊं नको जागा
काम क्रोधासी क्रोधासि आळा घाली
टाक ज्या जगतिं निंद्य चाली

नको मरमर मरमर करुंसे कांहीं
पाहिल्या कांहीं तुझें नाहीं
जासि उलथून उलथून एकटा गा !
पाप पुण्यास घेऊन संगा
म्हणुनि करिं कांहीं करिं कांहीं विवेकागा !
गणु म्हण जाय भक्तिमार्गा ॥ १ ॥

( चाल–लावणी )

आहे चित्तवृत्ति जोंवरी गड्या ! बावरी
तोंवरी न कांहिं होणार
जरिं बसलास गोदातिरीं ॥ धृ० ॥
मानापमान जोंवरी कळे अंतरीं
तोंवरि न तत्त्व कळणार
वाच खुशाल ज्ञानेश्वरा ॥ १ ॥
म्हणविशी ' आपण शाहणा ' जोंवरी मना !
तोंवरि न लीन होशील
करिं खुशाल हरी—पूजना ॥ २ ॥
जोंवरी छळाया परा पाहसी खरा
तोंवरि न दया कळणार
वाचि खुशाल भागवत घरा ॥ ३ ॥
कामास रजा जोंवरी देसि नीं खरी
तोंवरि नखरें वैराग्य
सुखें बाईल ठेवी दुरी ॥ ४ ॥

अनुभवाविना जोंवरी करिसि भाषण
तोंवरी फोल तें सारें
करि सुखें ग्रंथ--शोधन ॥ ५ ॥

गणु म्हणे ज्ञान आणि कृति जेथ नांदती
तेथेंच स्थिरावें मन
घरिं चालत ये श्रीपति ॥ ६ ॥

पद ( चाल--भला जन्म )

तेंच हरीचें भजन म्हणावें जें नुरवी कलि--मला
इतर जणुं बाजारचा गलबला ॥ ध्रु०

जळीं मिसळल्या जी नच बसवी गाळ तथातिळ तळा
अशा जो निवळि म्हणेल तो खुळा

चाल.—जो तमास उरवी तो नसी बा! खरा
जी गोड नसे ती होय काय शर्करा
चमकतो कांचमणी म्हणुनि होय का हिरा
क्षमा दया वाढते ज्या बळे शशिसम एकेक कळा
गणु म्हणे अशाच भजनीं वळा ।

पद ( चाल—फुलें वेलींचीं )

काय करावें हरि पहाया कोठें जावें ॥ ध्रु० ॥
म्हणती वारकरी पंढरीला ।
' प्रभु असे विटेसी ठेला '
म्हणतात यवन परि त्याला ।
दगड लेखावें ॥ हरि० ॥ १ ॥

'प्रार्थनासमाजी म्हणती।
" प्रभु असे ढगाच्या वरती।
ध्यावया करुनि तत्प्राप्ति ।
नेत्र झांकावे " हरि० ॥ २ ॥

सांगते ' थिऑसफि ' लोकां।
" द्या चालिरीतिला धक्का।
ॐकार शब्द हा घोका ।
विधी टाकावे " हरि० ॥ ३ ॥

मत ' आर्य समाजी यांचें '।
असे खरें परि न कामाचे।
' तनु त्यजुनि पूजन आत्म्याचें '।
म्हणति साधावें हरि० ॥ ४ ॥

मत--वैचित्र्याचें बंड।
माजलें महीस उदंड।
बळी पडलि बडी बडीं धेंड।
म्हणुनि कां ध्यावें हरि० ॥ ५ ॥

गणुदास म्हणे यासाठीं।
नामीं प्रीति धरुनियां मोठी।
विश्वास धरुनियां पोटीं।
वारिला यावं डोळे भरून प्रभुला पहावें ॥ ६ ॥

पद ( चा० शारद )

नरतनू तुला लाधली।
पर्वणी भली।

तरुन जा भवरे ।
मद, मत्सर, माया, लोभ अहंता भंवरे ॥ १ ॥

बसुं नकोस गाफिल जरा ।
मुढा पामरा ।
सोय कांहीं धरिरे ।
पद कमल विमल श्रीहरीचे चित्तीं स्मर रे ॥ २ ॥

नच जगीं कुणाचें कुणी ।
पुत्र कामिनी ।
धनाचे साथी ।
जाशील उलथनी नये कुणा संगातीं ॥ ३ ॥

भवनदित काम हा मगर ।
असे बहु जबर ।
सुजन हे कथिती ।
श्रीनाथ, तुकोबा, रामदास, निवृत्ति ॥ ४ ॥

तुज भंवति फिरे गरगरा ।
काळ हा खरा ।
जया यम म्हणती ।
घेऊन कठिणसे पाश आपुल्या हातीं ॥ ५ ॥

सोड, सोड उपाधी सारि ।
भजे श्रीहरि ।
गमविना आयु रे ।
करुं नको व्यर्थ या नरतनुचें मातेरें ॥ ६ ॥

धरिधरी समज अंतरीं ।
सोयरा करी ।
सखा श्रीहरि रे ।
नेवासें भवरातटीं कवनें गणु करि रे ॥ ७ ॥

पद

जिकडे तिकडे या पैशाचा मानमरातब तो सारा ।
झाडें, पहाड, पर्वत जिकडे, तिकडेच वाही तो वारा ।
भाई पहा मजा ॥ ध्रु० ॥

खिसा जयाचा गरम तया पुढें नरम सारे जन होती ।
' या या ' म्हणुनी गालीच्यावर कोडापाशीं स्थळ देती ।
भा० ॥ १ ॥

चळती ज्याच्या गृहीं तयाच्या पाहुण्यास ये बहु भरती ।
मांस पिंड तो दृष्टिस पडतां जशीं गिधाडें वरि जमती ॥भा०॥२॥

भ्रतार असल्या गरम तयाच्या बाईल झेलित वचनाला ॥
तोच झाल्या टरकल पुढती पाही मुरडुनि नाकाला ॥ ३ ॥

धनिक असल्या काळा म्हणती, वर्ण सांवळा मजेदार ।
दुर्गुण त्याचे सद्गुण होती पहा धनाचा किति जोर ॥ ४ ॥

सर्व धनाचे काका, मामा, बाईल भगिनी आप्तनरा ।
दास गणु म्हणे अनाथाचा वाली विठ्ठल एक खरा भा० ॥ ५ ॥

पद (सद्यः स्थितीवर)

कुठुन अठवले ढंग तुम्हांला बदफैली भले काय मजा
संकटानें उठाव केला घा चैनीला झणी रजा ॥ भा०

जिकडे तिकडे पाप अनन्वित वाण जाहली पुण्याची ।
म्हणुन संकटें घरांत घुसलीं फोडुनि कवाडें निष्ठेचीं ॥ भा०

ज्वर ताप तो प्लेगोबाचा पटकीला ती नाहिं दया ।
मधुनमधुन तो इन्फ्लुएन्झा येउं लागला भेटाया ॥ भा०

मलेरियाचें ठाणें उठेना अशक्तता ती बळावली ।
मधुमेहानें बड्या बड्याच्या माळ गळ्यामध्यें घातियली ॥ भा०

अवष्टंभ ते तरुणांमागें घेति हमेशा त्रिफळयाला ।
न्हात्या पोरी विचारिताती लाजुन औषध मदराला ॥ भा०

लहान लेकरें किरकिर करिती दूध मिळेना जननीचें ।
बाळशाचा मुळीं न पत्ता जिवंत सांपळे हडकांचे ॥ भा०

आला काळ हा किती उफराटा बाप मुलाची करी क्रिया ।
सासू म्हणे ती सूनबाईला कुंकु भाळिचें पूस बया ॥ भा०

जेष्ठ गेला आषाढ गेला श्रावण आला, नाहिं परी ।
पर्जन्याची एकहि धारा अवतरलिया भूमिवरी ॥ भा०

काळिं वावरें जिकडे तिकडे गुरें चाटिती दगडाला ।
माध्यान्हींचा काळ कठिण तो झाडानच पाला उरला ॥ भा०

गायि म्हशींचीं खिल्लारें तीं हालुं लागलीं वाऱ्यानीं ।
वरती माना करून बघती आणुन लोचनामधिं पाणी ॥ भा०

तान्हि वासरें दुसण्या देती दूध मिळेना कांसेला ।
पाणी प्यावें पोटभरी परि थेंब न वाहे सरितेला ॥ भा०

हें ऐसें तें व्हाया कारण पाप तुमचें तुम्हां फळे ।
पुण्यावांचून सुख तें नाहीं कुतर्क घेऊं नका बळें ॥ भा०

वेदवेत्या अग्निहोत्र्याला मिळति न तांदूळ मूठभरी ।
त्याहि जांवई घरास येतां झडं लागली शिरापुरी ॥ भा०

सालोसाल पडती देवळें चुना लाविना कुणी त्याला ।
इकडे पाहतां हॉल बांधिले म्रदरहूडच्या जेवणाला ॥ भा०

कथापुराणें अवघीं मेलीं कुणी न येती श्रवणाला ।
नाटकाचें नशिब शिकंदर मिळे न जागा बसण्याला ॥ भा०

देवा पुढतीं सांजवांत ना अनंत बत्त्या रंगमहालीं ।
कुलस्त्रियेला सूत कांठिना, छिनाल पांघरते शाली ॥ भा०

श्रुति स्मृती नी भारत भागवत ज्ञानेश्वरीवर करडी नजर ।
भाकड कादंबऱ्या, नाटकं यांचा मर्मे होत आदर ॥ भा०

साधु सज्जना संत महंता पाहुनि नाकें मुरडीती ।
सवाई गंधर्वास आणाया हटकुनि टांगा पाठविती ॥ भा०

स्नानसंध्या ध्यान धारणा ईशभक्तिला वेळ नसे ।
घंटा घंटा सांवरि नेक्टाय् केस डोकिचें विंचरितसे ॥ भ०

आल्या अतिथी अन्न मिळेना ग्यादरिंगची बहु गोडी ।
सोडा लिमलेट पीत दसादस, व्हिस्कीच्या बाटल्या फोडी ॥भा०

स्त्री वर्गामधि सालोसाल बहूत नखरा बळावला ।
विषयांची ती गोडी वाढली वैराग्या फांटा मिळाला ॥ भा०

परस्परीं तो द्वेष वाढला, प्रेम प्रीतिला झालि रजा ।
दुःखें याया कारण हेंची आतां तरि भाई मनि उमजा ॥ भा०

महार मांग ते भिल्ल रामोशी मरूं लागले, नच खाया ।
कहान, भावंडें तीं तुमचीं तुम्हास त्यांची ये न दया ॥ भा०

ज्येष्ठ भ्राता पितु:सम हें शास्त्र सांगतें कंठ रवें ।
या तत्वावर लोटुनि माती खूळ काढिती नित्यनवें ॥ भा०

सत्य न उरलें कवही कोठें खोट्यालागीं पूर आला ।
याच योगें समाज तुमचा गेलागेला रसातळा ॥ भा०

टॉनिक पाहतां कॉडलिव्हराइल, कोको, कॉफीचहा हवा ।
चाले उलटे जगा आठवले मुळिंच पटेना दूध खवा ॥ भा०

जातिजातीचे समाज निघाले ऐक्यवर्धन नाम तयां ।
झाड पडलें धरणीवरती फांद्या लागल्या नाचाया ॥ भा०

नकली साधू संत निघाले वरवर झांकी पांहुन घ्या ।
उत्सव, चातुर्मास, पुण्यतिथी ह्याच ज्यांच्या आहेत सुग्या ॥भा०

हिंदुधर्म हा तरुवर मोठा अनंत जाती तरुछाया ।
म्हणुनं तयाला शोभा आली राहूं द्या त्यां तोडूं नका ॥ भा०

हिंदु धर्मही सुरभी कपिला चौपायांची सुलक्षण ।
ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे पाय तियेचे मनिं आणा ॥ भा०

व्हावें असल्या सौख्य तुम्हाला निजधर्माला अनुसरणें ।
संतवरद श्रीकांत दयाघन सद्भक्तीनें नितस्मरणें ॥ भा०

चहुं वर्णांचा अभ्युदय तो होईल ऐसे कृत्य करा ।
व्यक्ति व्यक्तिचा द्वेष न करणें, अलोट प्रीती आणावरा ॥ भा०

पूर्वजांची आठवण ठेवा सत्प्रीतीला झुगारणें ।
वितंडवादा अश्रद्धेला दांभिकतेला पिटाळणें ॥ भा०

चैन करितां दैन्य होईल आळस कधिही नाहिं बरा ।
जें करणें तें करा विचारे मेळमकते ना पंथ बरा ॥ भा०

दासगणु म्हणे वर्म काढुनी श्रमायासी वृथा कुणा ।
शपथ वाहतों नाहीं रचिले बुधश्रेष्ठ हो या कवना ॥ भा०
मीही तुमच्यांतील एक मग वर्म काढुं तरि कवणाचें ।
वर्तन आपलें आहे बिघडलें म्हणुन बोललों या वाचें ॥ भा०
आतां अवघ्यां हीच विनंती दुष्कर्मांला देउन रजा ।
घ्या अपुलासा करुन भक्तीनें पंढरिचा तो विठुराजा ॥ भा०

पद ( चाल:—रामस्मराव्रा )

बद्ध प्रभू झाला भक्तिनें । बद्ध प्रभू झाला ॥ धृ० ॥
नाथगृहीं तो पाणी वाही । घेउनि कावडिला ॥ १ ॥
चोख्या संगें ओढि गुरें तो । घेउनि खांद्याला ॥ २ ॥
जनीसंगें दळण दळीतो । माउन गाण्याला ॥३ ॥
सावत्याचीं पाखरें राखी । बैसुन माळ्याला ॥४ ॥
दामाजीस्तव हा जगदात्मा । महार असे बनला ॥ ५ ॥
दासगणु म्हणे तो परमात्मा । भीमातिरिं रमला ॥ ६ ॥

पद

वैकुंठपुरी वैकुंठपुरी क्षेत्रराज पंढरी खरी ॥ धृ० ॥
मध्य भागिं मंदीर मनोहर आंत उभा श्रीहरि
भक्तशिरोमणि पुंडलीक मुनि चंद्रभागेच्या तिरीं
महाद्वारिं हनुमंत पुढें मल्लिकार्जुन विष जो धरी
भक्तवेशिचा वेस्कर चोखा प्रभुला जोहार करी

निजानुभव सांगण्यास बसला नामदेव पायरीवरी
उभा पुढारा गरुड प्रभूला जो घे स्कंधा वरी
आल्यागेल्याची खबर द्याया जनाबाई येरजार करी
प्रल्हाद बडवे देति प्रसादा सोळखांबीभीतरीं
हरिची माया जी उभगाया कठिण रुक्मिणी दुरी
गानपटू कलवंतिण कान्हो गातसे पंचमस्वरीं ॥
पृष्ठभागि पेठेंत बैसला सोनार श्रीनरहरी ।
जिकडेतिकडे नामघोष गर्जति टाळ झल्लरी ॥
प्रेमानंदें भक्त नाचती, पताक खांद्यावरी ।
दासगणु म्हणे एकवार तरि जाऊन या तिथवरी ॥ १ ॥

## पद

निराकार निर्गुण निरंजन व्यापक भुवनोदरीं ॥ धृ० ।
तें ब्रम्ह गौळियां घरीं खेळ खेळत नानापरी ॥
अनंत ब्रह्मांडें ज्या उदरीं सामावलीं साजिरीं ।
तो उमरा चढता हरी भिंतीचा टेंका धरी ॥
उपमन्यूला पयाब्धि दिधला ज्यानें अत्यादरीं ।
तो वाटी घेउन करीं पया मागे व्रजाभीतरीं ॥
फणी दंडिला; कंस मारिला जाउन मथुरापुरीं ।
परणिली भिमक सुंदरी कौंडण्यपुराभीतरीं ॥
निज मोठेपण त्यजुन जाहला पार्थ रथाच्या वरी ।
सारथी सखा श्री हरि जो कलिमळ अवघा हरी ।

तो जगजेठी पुंडलिकानें या भिवरेच्या तिरीं ।
केला उभा विटेच्यावरी गणुदास तदिय पद धरी ॥

पद ( ताल धुमाळी )

वेद पुकारत बडे अदबसे वो गोकुलमोखेल करे ॥ धृ०
पांगुलगाडा लेकर चालत जो पर्वतकू अधर धरे ॥ १
ग्यानि मुनी को लाभ नहीं है ऐसा उसका कर पकरे ॥ २
मान्यो रावण मान्यो पूतना वो बिल्लीसे श्याम डरे ॥ ३
भक्तनखातर बाल भये प्रभु उनकी इच्छा पूर्ण करे ॥ ४
दासगणु कहे ऐसो दयाघन हम पतितन को क्यौं विसरे ॥ ५

पद

सब देवनका देव बिठोवा है पंढरिमें खडा ।
हरदम जपना नाम उसीका क्यौं गफलतमें पडा दिवाने ॥

विठ्ठल विठ्ठल मूसे बालो घटे आयु दिनरात ।
परम शांतये परम दयालू अनाथको ये नाथ दिवाने ॥

पूजा पतरीढोंग धतूरा नहिं चहाते रघुनाथ ।
खाली चहाते दिल अदमीका ओ देवो उनके हात दिवाने ॥

भक्तनके वडे प्यारे प्रभुजी भक्तनपर दिल जडा ।
उनके खातर दासगणू ये भक्ती दादर चढा दिवाने. ॥

## ज्ञानेश्वरींतील वेंचे.

श्रीमद्भगवद्गीतेच्या ९ वे अध्यायातील १४ वे श्लोकांतील ' सततं कीर्तयंतो माम् ' या कीर्तन भक्तीवर ज्ञानोबारायांचे विचार फार मननीय व संग्रहणीय आहेत: ते येणेप्रमाणें

तरी कीर्तनाचे नि नट नाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चिताचे ।
जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥ १९७ ॥
यमदमा अवकळा आणिली । तीर्थें ठायावरूनि उठविलीं ।
यमलोकींची खुंटिली । राहटी आघवी ॥ १९८ ॥
यम म्हणे काय यमावे । दम म्हणे कवणातें दमावें ।
तीर्थें म्हणती काय खावे । दोष औषधासि नाहीं ॥ १९९ ॥
ऐसे माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें ।
अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥ २०० ॥
ते पाहांटेवीण पाहावित । अमृतेंवीण जीववित ।
योगेंवीण दावित । कैवल्य डोळां ॥ २०१ ॥
परी राया रंका पाड धरूं । नेणती सानेंयांथोरां कडसणी करूं ।
एकसरें आनंदाचें आवारु । होत जगा ॥ २०२ ॥
कहीं एखाधेनि वैकुंठा जावें । तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें ।
ऐसें नामघोष गौरवें । धवळलें विश्व ॥ २०३ ॥
तेजें सूर्य तैसे सोज्वळ । परि तोही अस्तवे हें किडाळ
चंद्र संपूर्ण एखादे वेळे । हे सदा पुरते ॥ २०४ ॥

मेघ उदार परी वोसरे । म्हणऊनि उपमेसी नपुरे ।
हे निःशंकपणें सपांखरे । पंचानन ॥ २०५ ॥

जयांचे वाचे पुढांभोजें । नाम नाचत असे माझें ।
जे जन्मसहस्त्रीं वोळंगिजे । एक वेळ यावया ॥ २०६ ॥

तो मी वैकुंठीं नसे । वेळ एक भानु बिंबींही न दिसे ।
वरी योगियांचींही मानसें । उमरडोनि जाय ॥ २०७ ॥

परी तयापाशीं पांडवा । मी हारपला गिंवसावा ।
जेथें नामघोषु बरवा । करिती माझा ॥ २०८ ॥

कैसे माझ्या गुणीं धाले । देशकाळातें विसरले ।
कीर्तने सुखी झाले । आपणपांचि ॥ २०९ ॥

कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामाचे निखिल प्रबंध ।
माझी आत्मचर्चा विशद । उदंड गाती ॥ २१० ॥

हें बहु असो यापरी । कीर्तीत मातें अवधारीं ।
एक विचरती चराचरीं । पांडु कुमरा ॥ २११ ॥

मग आणिक ते अर्जुना । साविया बहु वा जतना ।
पंचप्राण मना । पाढाउ घेउनी ॥ २१२ ॥

बाहरी यमनियांची कांटी लाविली ।
आंतु वज्रासनाची पौळी पन्नासिली ।
वरी प्राणायामाचीं मांडिलीं । वाहाती यंत्रें ॥ २१३ ॥

तेथ उल्हाट शक्तीचेनि उजिवडें । मन पवनाचेनि सुरवाडें
सतराविये‌चें पाणियाडें । बळयाविलें ॥ २१४ ॥

तेव्हां प्रत्याहारें ख्याती केली । विकारांची सपिळीं बोहेरिली ।
इंद्रियें बांधोनि आणिलीं । हृदयाआंतु ॥ २१५ ॥

तंव धारणावारू दाटिन्नले । महाभूतांतें एकवटिले ।
मय चतुरंग सैन्य निवटिलें । संकल्पाचें ॥ २१६ ॥

तयावरी जेत रे जैत । म्हणोनि ध्यानाचे निशाण वाजत ।
दिसे तन्मयाचें झळकत । एकछत्र ॥ २१७ ॥

पाठीं समाधि श्रियेचा अशेखा । आत्मानुभव राज्य सुखा ।
पट्टाभिषेको देखा । समरसें जाहला ॥ २१८ ॥

ऐसें हें गहन । अर्जुना माझें भजन ।
आतां ऐकें सांगेन । जे करिती एक ॥ २१९ ॥

अहल्या व इंद्र यांचा एकांत होऊन गौतमऋषीनें क्रोधवश होऊन तूं शिळा होशील म्हणून अहल्येला शाप दिल्यानंतर आपण मोठे तपस्वी असून आपण क्रोधाधीन झाल्याबद्दल त्याला महान् पश्चात्ताप होऊन तो स्वतः आपलाच धिःकार करून मेरूच्या पठारावर हिमाल्याचे एका शिखरावर तपश्चर्येसाठीं गेला आहे तो 'भावार्थरामायणां'तील प्रसंग अत्यंत बोधप्रद आहे तो येणेंप्रमाणे.—

शाप देवोनि कोपदृष्टीं । गौतमें सांडिली पर्णकुटी ।
सवेंचि अनुताप जाला पोटीं। म्हणें क्रोधें उठाउठीं जिंकिलें मज ॥८८॥
अहल्या इंद्रा अति प्रीतीं । सुखभोग भोगितां एकांतीं ।
तेव्हां कां मज नुपजे शांती । स्त्रीकामासक्तीं नाडिलों क्रोधें ॥ ८९ ॥
रतिसंभोग एकांतवासीं । इंद्र असतां अहल्येपासीं ।
अनुद्वेगें त्यागोनि त्यांसी । मी कां तपासी न वचेंची ॥ ९० ॥
सर्वांतरात्मा भोक्ता एक । ऐसा जाणतां जो मी देख ।
त्या मज इंद्रसंभोगाचें दुःख । ज्ञानेंसीं विवेक गिळिला क्रोधें ॥ ९१ ॥
माझी स्त्री माझें घर । हें कामक्रोधांचें निज मंदिर ।
येथें ठकले थोरथोर । मजही साचार नाडिलें क्रोधें ॥९२॥

माझी स्त्री हा जो अभिमान। हें सकळ दुःखाचें भाजन।
हेंचि क्रोधाचें जन्मस्थान। तेणें मी संपूर्ण नाडलों॥ ९३॥

गौतम पावन त्रिजगतीं। ऐसी पुराणीं प्रसिद्ध वदती।
तो मी स्त्रीलोभानुवृत्तीं। विवेकसंपत्ती नाडिलों क्रोधें॥ ९४॥

ज्यां गौतमें मध्यान्ह काळीं। नित्य पिकवोनियां साळी।
ऋषी वांचविले दुष्काळीं। तो मी तत्काळीं नाडिलों क्रोधें॥ ९५॥

मुख्यत्वे स्त्रीकामापासीं। क्रोध सर्वदा मुसमुसी।
तेणें नाडिलें मज गौतमासी। ज्यां कोणापासीं सांगावें॥ ९६॥

मातेवरी गालिप्रदान। भलता साहे करोनि हेळण।
स्त्रीवरोनि शिवी देतां जाण। तत्काळ मरण शस्त्रेंकां शापें॥ ९७॥

बाप क्रोधाची निज ख्याती। त्या दोघांची केली उपहती।
मज नाडिलें ज्ञानविरक्तीं। क्रोध परमार्थी घातक॥९८॥

क्रोध केवळ महामांग। जिवें मारिलें वैराग्य।
सकळ योग होय भंग। क्रोधें सर्वांग अतिअपवित्र॥९९॥

मातंगविटाळा जळें निवृत्ती। क्रोधाची चित्तामाजी वस्ती।
त्याचे क्षाळणीं न चले युक्ती। क्रोध सर्वार्थी घातक॥१००॥

का ते कांता कस्ते पुत्रः। ऐसें ज्यां वांचिलें शास्त्र।
तें वृथा गेलें पुराणपत्र। क्रोधें अपवित्र मज केलें॥१०१॥

कामासी जे वश होती। त कांहीं तरी भोग भोगिती।
जे आतुडले क्रोधा हातीं। ते वृथा नागवती भोगमोक्षां॥ १०२॥

क्रोधाऐसा वैरी। बैसला असतां जिव्हारीं।
जो तयासी मानी थोरी। तोचि चराचरीं अतिमूर्ख॥ २॥

अपकारिणि कोपश्चेत्कोपे कोपः कथं न ते।
धर्मार्थ काम मोक्षाणां प्रसह्य परिपंथिनि॥ २॥

अपकारिया वरी कोप करीती। परी कोणी कोपावरी कोप न करिती।
क्रोध वाटपाडा निश्चितीं। चहूं पुरुषार्थीं नागवी ॥ ४ ॥
त्या क्रोधाची हाय शांती। तैसें आचरेन तपस्थितीं।
ऐसा निश्चय करोनि चित्तीं। ऋषि तपार्थी निघाला ॥ ५ ॥

ए० भा० बा० कां० अ० १४

( प्रपंच व परमार्थ या दोहींचे कैचींत प्राण्याने सावधानपणे कसें वागलें पाहिजे त्याबद्दल श्रीरामचंद्रास श्री वसिष्ठाचा उपदेश. भा. रा. बा. कांडपृष्ठ ३९. श्लोक २३. )

अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो ब हिर्जडः।
अंतस्त्यागी बहिःसंगी लोके विहर राघव ॥ २३ ॥

अंतरीं आत्मा अद्वैत एक। तेणें मिथ्या समूळ लोक।
बाह्य कर्म जाणोनि संपादी लौकिक। विधिपूर्वक वेदोक्त ॥ २४४ ॥
अंतरीं केवळ शुद्धबुद्ध। बाह्य दिसे जैसा विषय बद्ध।
जडत्वें भासे जैसा मुग्ध। दिसे शुद्ध विषयार्थी ॥ ४५ ॥
अंतरीं निःशेष विषयत्याग। बाह्येंद्रियां विषयभोग।
भोगितां दिसे जरी सांग। तरी विषयाचें अंग आतळे ना ॥ ४६ ॥
अंतरीं पूर्ण निरास। बाह्य लोलुपत्वे करी आस।
जेंवि मसकेमाजी आकाश। फुगल्या आभास अडकलें दिसे ॥ ४७ ॥
अंतरीं निरपेक्ष निर्मळ। बाह्य नानाअर्थीं तळमळ।
लाघवी लोक झकवी सकळ। तैसी कळवळ मुक्तासी ॥ ४८ ॥
अंतरीं कामक्रोध निमाले। शांतीचें कल्याण पाहलें।
बाह्य क्रोधानळें खवळले। जेवीं मृगजळें मासे मारी ॥ ४९ ॥
बाह्य कार्य कारणा वेशा। गुरगुर करी व्याघ्र जैसा।
अंतरीं मृदु कोणी तैसा। कोणाही सहसा खुपेना ॥२५०॥

बाह्य दिसे कार्य करिता । परी अंतरीं अकर्ता निजात्मता ।
माथी कुलालचक्रीं भवतां । दिसे परी तत्वतां हलेना ॥ २५१ ॥

प्रपंच आणि परमार्थीं । उभयतां सावध स्थिती ।
हे अवताराची अवतार शक्ती । ते तुज निजमूर्ति रघुनाथा ॥२५२॥

ऐसियेगा स्थितीवरी । तूंही निजात्म चरित्रीं ।
स्वानंदे क्रीडें संसारी । लोकाचारीं अविकळत्वें ॥२५३॥

जेवीं बुद्धिबळें बाटें कोडें । मिथ्या राजा मिथ्या प्रधान हत्ती घोडे ।
हें जाणोनि खेळ खेळती पुढें । तेवीं मुक्ताकडे भवभाकी ॥ २५४॥

सोंकाटियां जीवभाव नाहीं । तरी मारिलें म्हणती पाहीं ।
तेवीं मुक्तदेहींच विदेही । भय नाहीं मरणाचें ॥ २५५॥

सोंकटी निमालियाही पाठीं । कोण धर्मात्मा चढे वैकुंठीं ।
कोण पडिले नरकसंकटीं । तेवीं निजात्मदृष्टी भव मिथ्या ॥ २५६ ॥

ऐसिया स्थितीवरी । तूंही सुखें संसारी ।
स्वानंदें क्रीडाकरीं । भय न धरीं श्रीरामा ॥२५७॥

राजा प्रधान पशुप्यादा कटक । बुद्धि बळीं अवघें काष्ट येक ।
तरी करिती खेळाचें कौतुक । तैसे सांसारिक मुक्तासी ॥ २५८ ॥

ऐसिया योगाची वृत्ती । रघुनाथा रघुपती ।
त्वांही सुखें संसारामती । स्वानंदस्थितीं क्रीडावें ॥ ५९ ॥

तस्माद्राज्यादि विषयान्पर्यालोच्य विनश्वरान् ।
देवकार्यादि संभारांस्त्यंज पुत्र सुखीभव ॥ २४८॥

चोडंबरीचा आंबा सुफळ । रस गोड परी मिथ्या मूळ ।
तेवीं मिथ्या लौकिक सकळ । जाणोनि अविकळ लोक संरक्षीं ॥ २६०॥

बहुरूपियाची रावराणी । नसोनि करिते संपादणी ।
तेवीं तूं श्रीरामराजा राजपणीं । मर्यादारक्षणीं वेदोक्त ॥ ६१ ॥

तुवांही निज अवतार वृत्तीं । सुखें असावें संसाराप्रती ।
धर्ममर्यादा पुराणोक्ती । स्वानंदस्थितीं क्रीडावें ॥ ६२ ॥

तोडीं नवग्रहांची बेडी । सोडवीं देवांची बांधवडी ।
उभवीं रामराज्याची गुडी । आज्ञा धडफुडी तिहीं लोकीं ॥ ६३ ॥

सांडीं समाधीची भ्रांती । धनुष्यबाण घेवोनि हातीं ।
रामनामाची ख्याती । त्रिजगतीं उद्धरीं ॥ ६४ ॥

ऐसें वसिष्ठ सांगतां । रामा परमानंदीं तल्लीनता ।
त्याच्या प्रबोधाची कथा । होय सांगता वाल्मीक ॥ १६५ ॥

साधुवर्य एकनाथ महाराज याचे भावार्थ रामायणांतील बालकांडांतर्गत श्रीराम व श्रीवशिष्ट यांचा ज्ञानसर्वस्व आणि बंधमोक्ष या विषयावरील अल्प संवाद मोठा बोधप्रद आहे त्याचा तितक्यापुरता उतारा:—

श्रीराम उवाच—येनैव भगवन्धीरा निश्चयेन महाधि या ।
विशाकाःसंस्थितास्तन्मे ब्रह्मन प्रब्रूहि तत्त्वतः ॥ १३ ॥

मागील धीरवीर परमार्थी । पावले विशोक ब्रह्म प्राप्ती ।
ते विशोक तेची स्थिती । मज कां निश्चितीं प्रकटेना ॥ २८ ॥

ऐसी उपदेशीं ज्ञान पदवी । जे धैर्यातें धैर्यचि आंगवी ।
अंग अंगातें स्वयें हरवी । विशोक सर्वभावीं जेणें मी होय ॥२९॥

ब्रह्मज्ञानाच्या उपपत्ती । सांगितल्या नाना युक्ती ।
जेणें सद्यःपावें ब्रह्मप्राप्ती । ते मज निश्चितीं सांगा स्वामी ॥३०॥

वशिष्ठ उवाच—श्रूयतां ज्ञान सर्वस्वंश्रुत्वा चैवाव धारयेत् ।
भोगेच्छा मात्रको बंधस्तत्त्यागो मोक्ष उच्यते ॥ १४ ॥

ऐके बापा रघुवीरा । सांगेन ज्ञानाच्या सर्व सारा ।
जो श्रवणार्थी चातक खरा । तो वाक्य सुखसारा झेलोनि घे ॥

ज्ञानकथा अवघेची ऐकती । परि ऐकिलें तें नाचरती ।
या लागीं श्रवणाची होय माती । परमार्थप्राप्ति त्यां कैंची ॥ ३२॥

पावन कथज्ञान गर्भोक्ती । अनवधानें ते श्रवण न निवती ।
माते चित्तामाजी केवीं पावती । त्यांची मननाची वस्ती उद्वस सदा

ऐसी निजकथा ऐकती । ते ऐकतांचि नाथकती ।
त्यांसी परमार्थाची प्राप्ती । कदा कल्पांतीं घडेना ॥ ३४ ॥

ऐकें श्रीरामा सावधान । येथें भोगेच्छा मुख्य बंधन ।
ते त्यागी तो ज्ञाता पूर्ण । तेथें मुक्तपण सहजची ॥ ३५ ॥

इच्छा त्याग अति कठिण । जो त्यागी तोचि विचक्षण ।
त्याही त्यागाचें लक्षण । निर्वाण खूण अवधारीं ॥ ३६ ॥

मनें मनातें आवरावें । मनें मनाते निग्रहावें ।
मनें मनातें धरावे । मनें मारावें मनातें ॥ ३७ ॥

मने मनाचा निग्रहो ऐसा । तेथें समूळ निमे आशा ।
चैतन्याचा ओते देह ठसा । प्रपंच आपैसा परब्रह्म होय ॥ ३८॥

ऐसिया सूक्ष्म अतियुक्तीं । परब्रह्माची सद्यःप्राप्ती ।
स्वयें परब्रह्मची आहाती । प्राप्ती अप्राप्ती भावाभावें ॥ ३९ ॥

स्वयंभू हृदयीं ब्रह्मस्थिती । ब्रह्मप्रभा इंद्रिय वृत्ती ।
तें अभावें ब्रह्म नव्हे ह्मणती । सद्भावें होती परब्रह्म ॥ १४० ॥

या सद्भावाची उपपत्ती । निश्चयें सांगेन रघुपती ।
दृढ धरावी सावधान वृत्ती । हे ब्रह्म स्थिती अभंग ॥ ४१ ॥
जेथें कामक्रोधां सलोभता । निःशेष नाहीं ते ब्रह्मशांतता ।
ते शांति ब्रह्म स्वभावता । सबाह्य पूर्णता सर्व देहीं ॥ ४२ ॥
ज्यासी मी म्हणिजे आपण । तें मीपणेंचि वपु चैतन्य ।
इंद्रियांचें कर्माचरण । तेंही आचरण पूर्ण परब्रह्मत्वे ॥ ४३ ॥
काया वाचा मनसा आचरण । ते तें सहजे ब्रह्मपूर्ण ।
हे ज्यासी आकळली खूण । तो तत्काळ जाण परब्रह्म जाला ४४
तो तत्काळ परब्रह्म जाला । म्हणतां लाज लागली पैं बोला ।
स्वयें ब्रह्मरूपे संचला । जाला न जाला ज्ञानाज्ञानें ॥ ४५ ॥
यालागीं गा रघुनाथा । स्वतःसिद्ध ब्रह्मरूपता ।
स्वये स्वयंभू ये हाता । या श्लोकार्था विनटोनी ॥ ४६ ॥
इंद्रियांचें कर्माचरण । सर्व देहीं समसमान ।
तें कर्मयोगीं सावधान । ब्रह्मानुसंधान निजनिष्ठा ॥ ४७ ॥
योगी स्वधर्म कर्म करिती । कर्मीं स्फुरे ब्रह्मप्रतीती ।
तेचि परमात्मयाची निजभक्ती । नित्य मुक्ती सावधानत्वे ॥ ४८ ॥
योगी जागृतीं सावधान । चित्सावधानत्वें देखती स्वप्न ।
सुषुप्तिसुखें समाधान । चिद्रूप पूर्ण भोगिती सदा ॥ ४९ ॥
ऐसा अवस्थात्रयीं सावधान । हेंचि भगवंताचें भजन ।
हेंचि परमात्मयाचें पूजन । हेंचि समाधान जीवशिवांचें ॥ ५० ॥
ऐसा सद्भावें साचार । जो सावधान निरंतर ।
त्यासी ब्रह्मरूप चराचर । विषय मात्र चिद्रूप ॥ ५१ ॥

यदिदं किंचिदाभाति जगज्जालं प्रदृश्यते ।
तत्सर्वममलं ब्रह्म बहिरंतर्व्यवस्थितम् ॥ १५ ॥

जे जें दिसे दृश्य दर्शन । जें जें विषय भोगायतन ।
ते ते निर्मळ ब्रह्म जाण । सबाह्य पूर्ण परब्रह्म ॥ ५२ ॥
मा हें एकैक सांगों किती । त्यासी ब्रह्मरूप त्रिजगती ।
सहज ठसावे रघुपती । तेही उपपत्ती अवधारीं ॥ ५३ ॥
ब्रह्मदृश्य द्रष्टादर्शन । ब्रह्म चतुर्दश भुवन ।
भूत परंपरा ब्रह्मपूर्ण । मी ह्मणणे तें मी पण परब्रह्मत्वें ॥ ५४॥
ब्रह्मरूपें भासती मित्र । ब्रह्मरूपें भासती पुत्र ।
शत्रु भासती चिन्मात्र । सुहृद समग्र सद्रूपत्वें ॥ ५५ ॥
शत्रु मित्र सखे बंधु । हा परब्रह्मीं अपवादु ।
ब्रह्म केवळ स्वानंद कंदु । परमानंदु परिपूर्ण ॥ ५६ ॥
ब्रह्मीं प्रपंच नाहीं ऐकिला । ब्रह्मीं प्रपंच नाहीं आथिला ।
ब्रह्मीं प्रपंच नाहीं स्पर्शला । भ्रांतीं भाविला निजभावना ॥५७॥
भ्रांतासी जगदुःखप्रतीती । ज्ञात्या सुखरूप विश्वमूर्ती ।
अंधा गडदपडे त्रिजगती । देखणे देखती स्वप्रकाशत्वें ॥ ५८ ॥
यालागीं ज्यां परमार्थबुद्धी । ते तोडिती भेदाची विधी ।
भेद तोडावया त्रिशुद्धी । भगवद्बुद्धी सर्वत्र ॥ ५९ ॥
ज्यां ब्रह्मभावो सर्व भूतीं । ते स्वये परब्रह्म होती ।
ते पूर्वीच ब्रह्म आहेती । भावना भ्रांतिच्छेदक ॥ ६० ॥
जो करी अमृतपान । तो अमर होय आपण । [illegible]
ज्यां सर्व भूतीं भगवद्भजन । ते परब्रह्म पूर्ण स्वयें होती ॥ ६१ ॥

ऐकें श्रीरामा जगाची स्थिती । परब्रह्म कां परम भ्रांती ।
विसरियाची नाहीं वस्ती । जाण निश्चितीं रघुनाथा ॥ ६२ ॥
नानाकारें जगाची प्रतीती । तेंचि मुख्यत्वे सोळींव भ्रांती ।
ते भ्रांतीची निजस्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ६३ ॥
भ्रमेणा हं भ्रमेणत्वं भ्रमेणोपासका जनाः ।
भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥ १६ ॥
अहमात्मा जे मी पण । ते मुख्यभ्रमाचे निजकारण ।
तूं म्हणणे हा भ्रम दारुण । मी तूंपण भ्रममूळ ॥ ६४ ॥
देव भक्त दोन्ही भिन्न। ऐसे जे कां उपासन ।
तें ज्ञानाचे मुख्य ज्ञानपण । सूक्ष्म भ्रमपूर्ण अतर्क्यत्वें ॥ ६५ ॥
ब्रह्म अखंडत्वें पूर्ण स्थिती । तेथें देव भक्त भिन्न मानिती ।
हे ज्ञान गुह्य अति भ्रांती । अतर्क्य निश्चितीं सज्ञाना ॥ ६६ ॥
ईश्वर तो अति वरिष्ठ । येरें भूत भौतिकें अति कनिष्ठ ।
हें भ्रमाचे अति कचाट । येथें श्रेष्ठ भुलविलें भ्रमें ॥ ६७ ॥
दोरीं सर्प जन्मला नाहीं । तो उपजे भ्रांतीचे ठायीं ।
तेवीं ब्रह्मीं जग नाहीं । आभासे पाहीं भ्रमामुळें ॥ ६८ ॥
जग देखणें हा परमभ्रम । जग न देखणें तें परब्रह्म ।
हें जाण गुह्य निजवर्म । तूं पुरुषोत्तम परमात्मा ॥ ६९ ॥
मी तुज सांगों तरी तूं परमात्मा । तुझा तूंच पाहे महिमा ।
तुझ्या स्वरूपासीं नाहीं सीमा । अपार अप्रमेय रघुनाथ ॥ ७० ॥
तूं आत्मा आत्मत्वें परिपूर्ण । तूं कर्माकर्म विहीन ।
तुज नाहीं स्थान मान । तें निजलक्षण अविचारी ॥ ७१ ॥

तझ्या स्वरूपाच्या निजस्थानीं । आकाश लोपे कोणेकोणीं ।
पाहतां न दिसे नयनीं । गेलें हरपोनी मिथ्यात्वें ॥ ७२ ॥
पाहतां स्वरूप शुद्धत्वें । लाजिलें पैं शोधितां सत्वें ।
स्वयें सामावलें महत्वें । मायेचे सत्व असत्वा आलें ॥ ७३ ॥
राईच्या कोटीच्या अंशाप्रती । वस्तु सावकाशें नांदती ।
अणुमाजी सुखस्वरूप स्थिती । वस्तु विश्रांति सावकाशें ॥ ७४ ॥
सूक्ष्माहूनि सूक्ष्मसार । जें नित्यत्वें नित्याक्षर ।
तें तुझे स्वरूप साचार । जीव शिवत्वे विचारअव्ययीं विरे ७५
वस्तूसी नाहीं मातापिता । यालागीं न घडे जन्मकथा ।
जन्मेंवीण मरण वार्ता । आत्मत्वीं सर्वथा असेना ॥ ७६ ॥
एवं जन्ममरणातीत । अपार सुखें सदोदित ।
त्या स्वरूपा नांव रघुनाथ । जाण निश्चित श्रीरामा ॥ ७७ ॥
वेदवेदांग पुराण । श्रुति स्मृति शास्त्र विज्ञान ।
इतिहासाचें गुह्य ज्ञान । तें हे निरूपण रघुनाथा ॥ ७८ ॥
सर्व साराचें मुख्य सार । तो हा इतिहास साचार ।
सकळ ज्ञानाचें ज्ञानगव्हर । अति उदार मुक्तत्वें ॥ ७९ ॥
हें निरूपण जीवीं घोटे । तैं विषयांचें लाहाणें फिटे ।
जन्म मरणाचे खत फाटे । भवभय आटे मृगजळत्वें ॥ १८० ॥
या इतिहासाचें निजवर्म । कर्मचि होय परब्रह्म ।
साधक होय आत्माराम । नित्यत्वें परम निजमोक्ष जोडे ॥८१॥
म्यां निरूपिलें जें निरुपण । तें जीवन्मुक्ताचें लक्षण ।
तूं आत्माराम आपण । पूर्णत्वें पूर्ण परमात्मा तूं ॥ ८२ ॥

ऐकोनि वसिष्ठाचे वचन । श्रीराम स्वयें आपण ।
आपुलें देखे पूर्णपण । स्वानंदघन सुखरूप ॥ ८३ ॥
होतां स्वरूपीं भेटी । चित्त चैतन्या पडली मिठी ।
हर्ष बाष्प दाटलें कंठीं । आनंद पोटीं न समाये ॥ ८४ ॥
आनंद हृदयीं न माये । तो नेत्रीं उलथूं पाहे ।
पूर्ण दाटला विस्मयें । देहाची सोय स्फुरेना ॥ ८५ ॥
प्राण पांगुळला जेथीचा तेथ । कंठ जाहला सद्गदित ।
इंद्रियें उपरमलीं समस्त । पाडिलें ताटस्थ्य चिद्रत्नें ॥ ८६ ॥
सर्वांगीं रोममूळीं । आली स्वेदकणिका निर्मळी ।
मुक्त मोतियांची जाळी । पांघुरविलीं निजसत्त्वें ॥ ८७ ॥
निःशेष नाठवे मी तूंपण । खुंटली वाचा पडिले मौन ।
जीव शिवांचे पुसिलें भान । चित्त समाधान पावलें ॥ ८८ ॥

सद्गुरुरूपी व्यक्त परमेश्वराची एकनिष्ठेनें सेवापूर्वक भक्ति केल्यास (भ. गी ४. ३४.) तत्प्रसादानें ज्ञानप्राप्तिद्वारा मोक्षलाभ होतो, हेंच प्रस्तुत सूत्राचें रहस्य आहे. ह्या एकांतिक भक्तीलाच गीतेंतील ज्ञानलक्षणांत अव्यभिचारिणी भक्ति (भ. गी. १३ १०) म्हटलें आहे; आणि तद्विरोधात्मकत्वास्तव निःश्रेयस नसलेल्या व्यभिचारिणी भक्तीचें ज्ञानेश्वरी, अध्याय १३, श्लोक ११, ओव्या ८०९ ते ८२३, ह्यामध्यें फारच मार्मिक वर्णन केलेलें आहे. " **रामदासीं देव एक। येर सर्वेहि मायिक** " ॥ ह्या उक्तींतील श्री समर्थांची एकनिष्ठा इतकी जबर होती कीं, पुराणांतील ब्रह्मा, विष्णु, शंकर इत्यादि भिन्नभाव त्याचा समूळ नाहींसा झालेला होता. " मनाचे श्लोक " लक्षपूर्वक वाचले म्हणजे आमच्या ह्या म्हणण्याची सहज सत्यता पटेल. पंढरपुरास त्याना श्रीविठ्ठलाचें दर्शन रामरूपानें झालें, त्या वेळचे त्यांचे " **येथें कारे उभा श्रीरामा** " इत्यादि उद्गार प्रसिद्धच आहेत. तथापि तात्पर्य असें आहे कीं, सर्वव्यापी, सर्वसमर्थ, सर्वद्रष्टा, अशा अंतर्भावनेनें परमेश्वराची कोणत्याहि रूपानें कोणत्याहि देशीं, कोणत्याहि वेळीं आणि कोणत्याहि प्रकारें जरी पूजा केली, तरी ती त्यालाच पावते, कारण तो परिच्छेदत्रयातीत असल्यामुळे तो नाहीं अशा देशाची, कालाची किंवा वस्तूची कल्पना करणें, हेंच त्याच्या सर्वतोपरी परिपूर्णतेचें अज्ञान होय. अमूर्त कल्पनेला मूर्त स्वरूप देणें हा मूर्त जिवाचा स्वभावधर्म आहे. नाहीं तर अव्यक्त परमेश्वराची स्तुति करावयाची कशी व ती ऐकावयाची तरी कशी ? आणि वाणीनें स्तुति करण्यांत किंवा ती श्रोत्रांनीं ऐकण्यात जर दोष नसेल, तर स्तुतिसदृश अत्युत्तमरूप नेत्रांनीं पाहण्यांत मात्र दोष का असावा ? त्याचप्रमाणें तत्त्वतः मुळांतच जर जीवेश अभिन्न असले तर त्यांची इंद्रियगोचर भिन्नता सहजच मिथ्या ठरेल. ह्यास्तव " **जीवोब्रह्मैव ना परः** " हा सिद्धान्त अमान्य करणारानीं प्रथमतः जीवेशाचें सांगोपांग वर्णन त्यांच्यामतें जें काय आहे तेंच पहावें, म्हणजे परमेश्वर सर्वव्यापी नाहीं ? किंवा तो निर्माल्य आहे, असा एकादा स्वमतविरोधी असिद्धान्त त्यांच्याच गळ्यांत पडेल !

सूत्र ११. लोकवेदेषु तदनुकूलाचरणं तद्विरोधिषूदासीनता च ।

आर्या. लौकिक वैदिक कर्मे, सांई--भक्तीस उचित तीं करणें ।
तदितर उपेक्ष्य केवल, परि नच तीं द्वेष्य होत सिद्धांतें ॥

**विवरणः**--परमात्म्याविषयीं आणि त्याच्या अखंड एकांतिक उपासने-विषयीं ब्रह्मात्मैक्यभावनेमुळे कर्मातीत सिद्धांची अंतःस्थिति कशी असते,ती मागील चार सूत्रात सांगून ह्या सूत्रात त्याचें बाह्याचरण कसें असतें ते सागितलें आहे आठव्या आणि नवव्या सूत्रांत जी अंतःस्थिति सागितली, तदनुरोधानेच त्याचें बाह्याचरण असते; म्हणजे फक्त ऐकांतिक भक्त्यनुकूल असलेल्या **प्रशस्त** कर्मांचा ( भ. गी. १७-२३ ते २७ ) अंगिकार करून तदितराकडे ते ढूंकूनहि पहात नाहींत, असा ह्या सूत्राचा अर्थ आहे. परंतु अनिविषयीं नवव्या सूत्राप्रमाणें ह्या सूत्रातहि पुनः ते उदासीनता म्हणजे उपेक्षानामक शुभ वासनाच मनात ठेवतात, असे म्हटलें आहे. ह्यावरून भक्तियोगी सिद्ध पुरुषांचा सर्व भूतांचे ठायीं अद्वेष ( भ गी. १२-१३) कसा अखंड असतो त्याचा बोध होतो. ह्या द्वेषराहि-त्याचा एकादे वेळीं जर केवळ प्रारब्धवशात् भंग झाला, तर ते निस्त्रैगुण्यास्तव

**प्रकाशंच प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ।**
**नद्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षती** ( भ. गी. १४. २२

**( अर्थ-आर्या-स्वकृत )**

सत्वादि गुणांचीं जीं, कार्यें ज्ञान प्रवृत्ति मोह अशीं ।
नोद्भव त्यांचा इच्छी, उद्भवल्या त्यागही कदा न करी ।

ह्या भगवदुक्त्यन्वयें त्याचीहि पर्वा करीत नाहींत; कारण प्रारब्धकर्माचा त्याग शक्य नसून त्याच्यामुळें कांहीं एक पापनिष्पत्ति न होता उलट पापमूलक संचित कर्माचा त्याच्यायोगें अंशतः क्षयच होतो, हें **कर्मरहस्य** त्यांना समजलेलें असतें ह्याचेंच नांव **खरा भक्तिप्रधान कर्मयोग**.ज्या कर्मयोगामध्यें प्रस्तुत सूत्रो-क्त्यन्वयें **शुद्ध** भक्तीस प्राधान्य नाहीं, त्याला भक्तिप्रधानता येणें अशक्य आहे.

सूत्र १२. भवतु निश्चयदार्ढ्यादूर्ध्वं शास्त्ररक्षणम् ।

आर्या. ऐकान्तिक भक्तीचा, सनिश्चय जाहला तरी साई ।
म्हणतो शास्त्राज्ञेचे पालन करण्यात दोष होत नसे ॥

विवरण.—भक्त्यनुकूल असलेल्या सकल शास्त्रोक्त आणि लौकिक कर्मांविषयीं सिद्ध पुरुषाची उदासीन वृत्ति असते, ह्या मागील सूत्रांतील नियमांत ह्या सूत्रातील "भवतु" ह्या शब्दाने थोडीशी ढिलाई करून, पूर्ण श्रद्धायुक्त ऐकांतिक भक्तीचा अंतःकरणांत जिवत पाझर फुटल्यानंतरहि साधकावस्थेतील अंतर प्राग्जन्मातील कर्मसंस्कारांचा पगडा बुद्धीवर शिल्लक राहून त्यामुळें कर्मातीत सिद्धावस्थेच्या पुढची पूर्ण नैष्कर्म्यसिद्धि ( भ. गी. १८–४५ ते ५५ ) प्राप्त झाली नाहीं तोपर्यंत भक्तीला अनवश्यक असलेलींहि कांहीं शास्त्रोक्त कर्में सिद्ध पुरुष करीत असतात, असें येथे सांगितलें असून असा प्रकार घडण्याचें कारण पुढील सूत्रांतच सांगितले आहे. चतुर्थसूत्रोक्त सिद्धावस्थेच्या आद्य स्थितींत असा प्रकार होणें शक्य आहे; आणि तो झाला तरी त्यायोगें भक्तिमार्गांत प्रत्यवाय येण्याची मुळींच भीति नसून उलट भक्तीची प्रगति होण्यास त्याचें सहाय्यच होईल. कारण प्रशस्त कर्में भक्तिजनक आहेत. ईश्वरप्रसादानें अज्ञान पूर्णत्वें नष्ट झालें नाहीं, तोंपर्यंत सिद्धावस्थेच्या पूर्वीची सत्कर्मासक्ति क्वचित् राहणारच, असें "**सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते**" ॥ ( भ. गी. ४।३३ ) ह्या **ज्ञानकर्मसमुच्चयविरोधी** भगवद्वचनावरूनहि सिद्ध होते. भक्तिलाभ झाला ( सूत्र ४ ) तरी भक्तीनें अंतःकरणांत पक्के ठाणे दिलें नाहीं ( सूत्र ५ ), तोंपर्यंत "**सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज** ॥" ( भ. गी. १८.६६ ) ह्या भगवदुक्तीचें रहस्य लक्षात न येणें शक्य आहे; आणि तें उमजलें नाहीं तोंपर्यंतच कर्में निःशेष होत नाहीत. तें उमजलें म्हणजे मात्र

"हरिपण हरिनामें धातुमूर्तीस झालें ।
हरिमय हरिनामें विश्व संतांसि झालें ॥

भवभय हरिनामें साधकांचे पळालें ।
भज भज भज जिव्हे रामनामें रसाळें ॥ "

ह्या श्लोकातील भजनमहात्म्य चित्तांत उत्तम बिंबून सिद्ध पुरुषाची सकल भक्त्यननुकूल कर्मांतून पूर्णत्वें मुक्तता होते.

" यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपो यज्ञ क्रियादिषु ॥
न्यूनं संपूर्णता याति सद्यो वंदे तमच्युतम् ॥ "

( अर्थ--आर्या )

प्रभु अच्युत नामाच्या, उच्चारें वा जयाचिया स्मरणें ॥
कर्म विगुणता जाते, त्या भगवंता असो नमन आधीं ॥

ह्या श्लोकाच्या अर्थाचा पूर्ण विचार केला असतां असे दिसून येतें कीं, ज्या नामाच्या योगाशिवाय सत्कर्माचीहि पूर्णता होत नाहीं, त्या नामाची योग्यता सर्व कर्मांपेक्षा अधिक असलीच पाहिजे. असें ज्ञान झालेला पुरुषच पक्का सिद्ध होय, आणि पक्की सिद्धावस्था म्हणजेच कर्मातीतता होय.

यथासांग रे कर्म तेहि घडेना ।
घडे कर्म तें पुण्य गाठी पडेना ॥
दया पाहतां सर्व भूतीं असेना ।
फुकाचे मुखीं नाम तेही वसेना ॥

या समर्थोक्तीतहि कर्मास गौणत्व देऊन भक्तीचेंच महात्म्य गायिलें आहे. व तिच्यांतील समतायुक्त दयारूपी ईश्वराच्या मुख्य धर्माचें श्री तुकारामांनी "**नम्र झाला भूता । तेणें कोंडिलें अनंता ॥**" असें महत्तमत्व सांगितलें आहे, कारण भूतमात्रीं दया असणें, हे "**जीवो ब्रह्मैव नापरः**" ह्या सिद्धान्ताप्रमाणें भक्तीचें श्रेष्ठ स्वरूप आहे; आणि त्याचमुळें

"**दया धरमकामूल है । पापमूल अभिमान ॥**
**तुलसी दया न छांडिये । जबलग घटमें प्राण ॥**"

ह्या सिद्धान्तान्वयें कोणतेहि कर्म स्वरूपतः समतायुक्त प्रेममूलक दयारूपी भक्तीच्या पासंगाल्राहि पुरणार नाहीं. तुलसीदासांनीं " पापमूल अभिमान " ह्या उक्तींत अहंभावाला पापमूलक म्हटले आहे, त्याचें कारण असे आहे कीं, त्याच्याचपासून लोकैषणा, दारैषणा, वित्तैषणा, पुत्रैषणा ह्या पापमय वासनांचा उद्भव होत असून तोच

"अहंभाव ज्या मानसीचा सरेना ।
तया ज्ञान ते अन्न-पोटीं जिरेना ॥"

ह्या श्रीसमर्थोक्तीप्रमाणें ज्ञाननाशक आहे. "तो नष्ट झाल्याशिवाय " समत्वं योग उच्यते " ( भ. गी. २-४८ ) ह्या भगवदुक्तींत वर्णिलेली योगात्मक साम्यबुद्धि ( भ. गी. ६-३३ ) उत्पन्न होणें शक्य नाहीं, आणि ती उत्पन्न झाली नाहीं तोंपर्यंत " दया करी जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ तुका म्हणे सांगों किती ॥ तोची भगवंताची मूर्ती " असा अधिकार प्राप्त होणें संभवनीयच नाही. माता आपल्या मुलाला प्रेमास्तवच ताडन करिते, आणि प्रेमास्तवच आलिंगनहि देते, असें जें आम्ही मागें म्हटलें आहे त्यावरून कर्म स्वरूपाचें मिथ्यात्व सहजच लक्षात येईल; आणि तें लक्षांत आलें म्हणजे " [illegible] नांव । संतांचें पालन । आणिक निर्दळण कंटकांचें ॥" ही " सर्वभूतहिते-रताः" ( भ. गी. १२. ४) अशा भक्ताची 'दया' [illegible] आहे, अशी खात्री होईल. सारांश कर्मस्वरूपास महत्ता [illegible] कर्महेतु मात्र फलदायक होतो, हेंच सत्य आहे. [illegible] आहे. कारण एकाद्या कोट्याधिशानें एकाद्या [illegible] रुपयाची देणगी दिली, तरी तिच्यापेक्षां एकाद्या [illegible] सत्कार्यास आपले सर्वस्व म्हणून नुसते दहा रुपये [illegible] त्या दरिद्री मनुष्याची अल्प देणगी त्या [illegible] अधिक किंमतीची ठरेल. हा विचार मनांत आणूनच [illegible] ( [illegible] ) [illegible] फलं तोयं । यो मे भक्त्या प्रयच्छति [illegible] उक्तींत भक्तीलाच महत्व दिलें [illegible]

कर्माचा नसतो. आधिभौतिक कारणापासून जें कार्य निष्पन्न होते, ते अध्यात्मिक असणें शक्य नसून केवळ आधिभौतिकच असणार, आणि त्या कार्याच्याद्वारे जी सेवा घडेल तीहि आधिभौतिकच असणार त्याचप्रमाणे अध्यात्मिक कार्यनिष्पत्ति व्हावी अशी इच्छा असल्यास त्या कार्याचे कारण ( हेतु )हि अध्यात्मिक असणें अवश्य आहे. अशा विचारानेच **"भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनोऽपि माम्"** ( भ. गी. ९-- २५ ) ह्या उक्तींतील भिन्न कारणांची पुनरावृत्तिदायक व **मुक्तिदायक** अशी भिन्न असलेलीं कार्यें न्याय्य ठरतात. अर्थात आध्यात्मिक लाभार्थ केलेले शास्त्रोक्त यज्ञ ( पूजन ) मात्र श्रेयस्कर होत. बाकीचीं सर्व अनध्यात्मिक कर्में बंधक आहेत ( भ. गी. ३. ९ ) शिवाय सकल आधिभौतिक कार्य--कारणे व्यक्त ( दृश्य ) असून अध्यात्मिकाचें स्वरूप अव्यक्त असते; ह्यावरूनहि असा सहज बोध होतो कीं, सर्व आधिभौतिक कर्म--फले दृश्यत्वास्तव त्याच्या कारणासह ऐहिकच आहेत; म्हणजे अर्थात् तीं परमार्थिक नाहींत. आणि ह्याच कारणास्तव **लोकसंग्रहरूपी** आधिभौतिक कार्यांच्या नादीं मुमुक्षूंनीं लागू नये, असा भगवद्गीतार्थबोधक अनुगीतेमध्यें भगवान् श्रीकृष्णानीं स्वतःच अर्जुनाला पुनरुपदेश केलेला आहे. ह्यावरून असें स्पष्टपणें प्रस्थापित होते कीं, कर्मातीत सिद्ध पुरुषानीं भक्त्यननुकूल असलेल्या सकल वैदिक आणि लौकिक आचाराचा त्याग करावा, म्हणजे कर्मसंन्यास करावा, हेच उत्तम. आणि भक्त्यननुकूल असलेलीं काहीं शास्त्रोक्त कर्में शास्त्राज्ञापालनार्थ करावीं, अशी जर बुद्धि झालीच, तर निदान आपला अधिकार ओळखून जी भगवदर्पणास योग्य नसतील तीं करूं नये, व जीं करावयाचीं तींहि परमेश्वरेतरार्थ करूं नये; नाहीं तर भगवंताला उच्छिष्ट कर्मार्पण केल्याचा दोष लागेल.

**सूत्र १३ अन्यथा पातित्याशंकया ।**

**आर्या.** विधिच्या त्यागानें ये, पातित्याची जरी मनीं शंका ।
शास्त्राज्ञा रक्षावी, कर्में अर्पूनि सांइला स्वमने ॥

विवरणः--कर्म, अकर्म, आणि विकर्म ह्यांचा दुसऱ्या सूत्राच्या विवेचनांत स्पष्टार्थ सांगितला आहे. पण तथें कर्माचे ( क्रियमाणाचे ) विधि आणि नियम असे जे दोन पोटभेद आहेत, त्याच्यांत अंतर काय आहे तें सांगितलें नाहीं; ह्यास्तव तें आतां सांगूं. विधि ( obligatory duties ) म्हणजे वर्णाश्रमानुसार अवश्य करावयाचीं कर्मे होत; अणि नियम optional duties) म्हणजे जीं कर्मे करावयास प्रत्यवाय नाहीं तशीं कर्मे होत. विवाह हें नियमाचें उदाहरण होय. विवाह हा विधि नव्हे. तो जर विधि असता तर श्रीमन्नारद, भक्त्याचार्य, श्रेष्ठ बुद्धिमान् श्रीमारुति, सर्वशास्त्रविशारद श्री भीष्म, श्रीमदाद्य शंकराचार्य, श्रीज्ञानदेव, श्रीसमर्थ रामदास इत्यादि महाज्ञानी भगवद्भक्तश्रेष्ठ पुरुष वैदिक धर्मदृष्ट्या धर्मभ्रष्ट ( पतित ) ठरले असते. ह्या विधि--नियम-रूपी कर्मांच्या आचरणाचे नियम ( Procedure ) शास्त्रांत आहेत. भक्तिमार्गी पुरुष कोणत्याहि वर्णाचा अथवा कोणत्याहि आश्रमांतील असूं शकेल. आणि तो कोणत्याहि वर्णाचा व कोणत्याहि आश्रमांतील असला, तरी शेवटीं तो स्वभक्तीच्या बळानें ईशप्रसादास पात्र होऊन ज्ञानप्राप्तिद्वारा ईश्वराप्रमाणें अतिवर्णाश्रमी होतो, असा भक्तिजन्य ज्ञानाचा महिमा आहे. " **स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः** " ( भ. गी. १८-४६ ) ह्या भगवदुक्तीप्रमाणे, संसिद्धावस्था प्राप्त करून घेण्याचा प्रत्येक जिवाला अधिकार आहे. अशा थोर अधिकाराच्या जिवांनीं आपापसांतील तरतमभाव केवळ व्यावहारिक दृष्ट्या अधिकाधिक विस्तृत करीत बसणें, हें शुद्ध अज्ञान होय. " **जीवो ब्रह्मैव ना परः** " ह्या श्रुतींत सकल स्थावरजंगमात्मक जिवांचे पूर्णैक्य सांगितलें आहे. त्याचप्रमाणें

**" न चर्मणो न रक्तस्य न मांसस्य न चास्थिनः ॥**
**प्राणस्य नात्मनो जातिर्व्यवहारोपि कल्पितः "**

( अर्थ--ज्ञानसागर )

चर्म रक्त मांस अस्थि । प्राण आत्मायांत नाहीं जाती ॥
ह्यांत ब्राह्मण कोण असती । सांग मातें ॥

असा विचार केला तरी जातींचा कोठेहि मुळींच पत्ता लागत नाहीं त्या केवळ कल्पित आहेत; आणि ती कल्पना मन:संस्कारजन्य सहज ( स्वभावज ) गुणकर्मानुसार केलेली आहे. तिच्याचमुळे सकल उच्चनीच भाव उत्पन्न झाले असून तिच्या कारणाचा नाश झाल्याशिवाय ती नष्ट होणें शक्य नाहीं. आणि "**जीवो ब्रह्मैव ना पर:**" ह्या श्रुतिप्रमाणे सकल जिवाचे तत्त्वत: ऐक्यच असल्याकारणाने मन:संस्कारणजन्य गुणकर्मोद्भूत भेदभाव नष्ट करणे, हे प्रत्येक जिवाचे कर्तव्य आहे. मन:संस्काराचे नीचत्व जाऊन त्यांना उच्चत्व प्राप्त होण्यास नित्य सुसंगतीचा फार उपयोग होतो; आणि "**यथा बीजं तथांकुर:**" ( जें पेरावे ते उगवते ) हा प्रत्यक्षानुभवहि सार्वत्रिक आहेच. ह्यास्तव क्रमाक्रमानें सकल मानवजातीची उन्नति होऊन तिच्यातील कल्पित भेदभावाचा क्षय होत जावा, ह्या अतिउदार हेतूने मनुस्मृतींत अनुलोम विवाह ग्राह्य मानिला आहे. भगवान् मनूला आपल्या वंशाची ( मानवांची ) उन्नतावस्था सतत चालू रहावी ह्याविषयीं किती काळजी होती, ते ह्यावरून सहज लक्षात येण्याजोगें असून तिकडे कोणाचेंच लक्ष जात नाहीं!

परंतु हा वैवाहिक संबंध मानव सृष्टींतील आहे; व त्याचा कोणताहि प्रकार पाहिला तरी तो सदोष असणारच. त्यांच्या योगानें मनुष्यास ( जिवाला ) अति प्रिय असलेले स्वातंत्र्य अंशत: तरी नष्ट होतेंच; व त्याचमुळे द्वितीय सूत्राच्या विवरणांत "**निष्काम कर्म**" ह्याचा विचार करतांना दिलेल्या एका इंग्रजी ग्रंथातील उताऱ्यांत दृश्य होणाऱ्या अनिष्ट वर्तनाचे नानाप्रकार सृष्टींत सर्वत्र सुरू आहेत. वैय्यक्तिक संपत्ति-विभागामुळें मनुष्यांत तीव्र विषमता उत्पन्न होऊन अभिमान वाढतो आणि विवाहसंस्थेमुळें मनुष्याचें व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होऊन, प्रेमाचें क्षेत्र मर्यादित होतें, यासाठीं त्या दोन्ही संस्थांचें उच्चाटण करून जीवसृष्टि ( मानवसृष्टि ) शक्य तितकी ईशसृष्टीच्या जवळ नेऊन भिडविण्याचा प्रयत्न गेल्या शतकांत अमेरिकेंत "**ओनीडा कम्यूनिटी**" नामक समाजानें करून ह्या कामीं त्या समाजास

बहुमोल यश आले असताहि अमेरिकेसारख्या प्रगतीच्या शिखरास पोंचलेल्या राष्ट्राचे देखील त्या अल्पसंख्याक लोकांच्या अलौकिक प्रगतीने डोळे फुटल्यामुळे त्या समाजाचा नायनाट झाला; त्याची सविस्तर हकीकत न्यूयॉर्क शहरांतील डॉ० फ़्ट नांवाच्या गृहस्थाच्या " प्लेन् होम् टॅक् एम्ब्रेसिंग् मेडिकल् कॉमन् सेन्स् " नामक ग्रंथांत सुमारें चाळीस वर्षांपूर्वी वाचलेली आम्हाला स्मरते तिजवरून हा मृत्युलोक सदोदित पापमयच राहणार असें वाटतें. जगाची अशी परीक्षा होऊन त्याचा वीट आला म्हणजे ह्या जन्मीं अथवा जन्मांतरीं वैराग्य प्राप्ति होते; आणि नंतर वैराग्यद्वारा अध्यात्माची गोडी लागून जीव ईश-भक्तीस प्रवृत्त होतो, व भक्तिद्वारा ईशप्रसाद होऊन त्यायोगे जीवेशैक्य ज्ञान होतें, म्हणजे अर्थात् जीव मुक्त होतो ह्या मुक्तिमार्गांत असताना अनंत जन्मांतील सुकृतसाफल्यानें सिद्धावस्था प्राप्त झालेल्या कर्मातीत पुरुषांची देखील स्वस्वरूपाच्या पूर्ण--ज्ञानाभावीं कर्मवासना शिल्लक रहावी, ह्याचेंच नांव मायेचें दुर्धरत्व; परंतु काहीं झाले तरी "**न मे भक्तः प्रणश्यति**" ( भ. गी. ९--३१ ) ही भगवंताची प्रतिज्ञा मिथ्या होणे शक्य नसल्यामुळें भक्तिमार्गांतील साधकहि अखेरीस मुक्त होतोच ( भ. गी. ६--४० ते ४४ ), मग सिद्धावस्था प्राप्त झालेला पुरुष मुक्त होईल ह्यांत काय शंका आहे ? संसारसागर कितीहि अगाध असला, तरी "**विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितोजगत्**" ( भ. ग. १०--४२ ) अशा आपल्या रोमावर त्याला धारण करणाऱ्या नावाड्याची कास धरल्यास तो बिचारा बुडवणार कसा ? अखेरीस "**यावच्चंद्रदिवाकर**" असें म्हणून चंद्रसूर्यांना अमर समजणारांनीं असें ध्यानांत ठेवावें कीं,

> "**गत्वागत्वा निवर्तंते चंद्रसूर्यादयो ग्रहा ।**
>
> **अद्यापि न निवर्तंते द्वादशाक्षरचिंतकाः**" ॥ ( अनुस्मृति १०६ )

ह्या स्मृत्यन्वयें अति दीर्घायुष्यास्तव ( चिरायुत्वास्तव ) सदागति चंद्रसूर्य जरा अमर वाटले, तरी त्यांना पुनरावृत्ति ( जन्ममरण ) चुकत नसून " ॐ नमो